REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# आम्ही काबाडाचे धनी : बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट




डॉ. राजाराम राठोड
मराठी विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर.

## प्रस्तावना

इंद्रजित भालेरावांची कविता ही शेतीच्या मालकापेक्षाही कष्टाच्या मालकाची आहे. शेतीचा सातबारा भले कोणाच्याही नावे असो शेतीत राबणाऱ्याचे आर्त ही कविता गाते. पीढ्यानं पीढ्या या मातीत मळल्याची साक्ष देणाऱ्यांच्या या कविता आहेत. कोणी किती दिलं या पेक्षा मी काय दिलं अशा मातीच्या व मातृह्रदयी माणसांची ही कहाणी आहे. पण दुष्काळाचे कढ तिला व त्याला सोसत नाही. हे न उकलणारे गणित मांडणारी कविता विचार करायला लावते. शेतकऱ्यांची वेदना भालेरावांच्या कवितेचा अंतःस्वर आहे. हा अंतःस्वर, उमाळा – पीक पाणी, आम्ही काबाडाचे धनी, टाहो, कुळंबिणिची कहाणी या कवितासंग्रहातून हुंदक्याच्या रूपात प्रकटतो. हा हुंदका काळीज चिरणारा आहे. टाहो हुंदक्याचे स्वर घेऊन प्रकटताना डोळे डबडबावेत व काही क्षण मोकळं मोकळं वाटावं अशी अनुभूती येते. या अनुभूतीत विरेचन आहे. विरेचनाने दुःख हलके होते संपत नाही. उद्ध्वस्ततेतून आलेल्या हुंदक्याचे रुदन सुरू झाले की गळा गायला लागतो व शिवाराच्या समृध्दीच्या, नीतीमत्तेच्या श्रीमंतीच्या आठवणी यायला लागतात. दुःख दुप्पट जोमाने वाढते. हा स्वर इंद्रजित भालेराव यांना सापडल्याने शिवाराचे संगीत त्यांच्या कवितेतून स्त्रवते. श्रुती धन्य होतात. हा सूर सापडण्यासाठी त्यांनी केलेला रियाज ही तेवढ्याच तोलामोलाचे असणार. त्याशिवाय का त्यांच्या कवितेला 'लोकगीताचे' लेणे लाभत आहे. शिवाराचं गारूड काय असतं? यासाठी भालेरावांची कविता वाचावी. बगळा बगळा कोडी दे म्हणत पाची बोटं रंगवून घ्यावी. सरळ, निरागस, थेट, लोकबोलीचा वारसा घेऊन त्यांची कविता प्रवाहित झालेली आहे. नगारातुताराचा खेळ खेळणारी कविता आहे. झाडावर चढणे, पोहणे आदी देशी खेळ अस्सल रुपाने मांडणारी आहे. क्रिकेटसारखी पांढरपेशी निश्चितच नाही. झिम्मा फुगडीचा नखरा व जिवंतता या कवितेच्या रंध्रारंध्रातून वाहते. माती, माय, बहिण बद्दल बोलताना ही कविता मऊ, मायाळ होते. तारूण्याचा बहर चेतवताना ती खट्याळ होते. अर्थात हा खट्याळपणा संयमित आहे. रुसवे फुगवे चौतन्यदायी आहेत तर कवितेतील मृत्यू घायाळ करणारे आहेत. निसर्गाबद्दल बोलताना कवितेला कंठ फुटतो. अध्यात्म कड्याकपारीतून स्त्रवतो. संताचे बोल व शिवाराचे खोल हा या कवितेचा पाया आहे.

## आम्ही काबाडाचे धनी : बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट

'आम्ही काबाडाचे धनी' ही एक दीर्घ अशी सशक्त कविता आहे. शेतकरी, त्याचा चरितार्थ व त्याचे जगणे मरणे समर्थपणे कवितेत आले आहे. 'बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट। ओघ बारा वाटे मुरडताती'[1] याप्रमाणे दुःखाचे ओघ तीव्र आहेत. हजारो वर्षाच्या जगण्यातून कृषी संस्कृतीचा बांध तयार झाला व मुक्त अर्थव्यवस्थेच्या धक्क्याने या बांधाला तडे गेल्याने दुःख अनेक ओघांनी–वाटांनी काव्यमय रुप घेऊन प्रकटते. संवेदनशील वाचकाला अस्वस्थ करण्याची ताकद या कवितेत आहे. कविता वाचताना डोळ्यांच्या कडा ओल्या होण्याइतपत सामर्थ्य या कवितेत आहे. शेतकऱ्याचा कैवार घेऊन त्याच्या जगण्या मरण्याला आपली लेखनी सर्वस्वी बहाल करून कवी इंद्रजित भालेराव यांनी मराठी कवितेत मोलाची भर घातली आहे. कवितेची सुरवात 'जल्मा' पासून होते. आडरानातील स्त्रीच्या प्रसववेदना माणूस जन्माची कहाणी सांगतात.

'घास कुटका खाऊन जरा टेकविली पाठ
आल्या एकाएकी कळा हातपाय झाले ताठ
घामाघुम झाली माय कावरली बावरली
रेटा देऊन हाताला कशीबशी सावरली
सावरता सावरता कळ उठली जोरात
आडरानात हारन थरकापली उरात'[२]

गाव शिवारापर्यंत रस्ते पोहचले नव्हते. वीज नव्हती. वाहतुकीच्या फारशा सुविधा नव्हत्या. बाळंतपणाचे आजच्याप्रमाणे लाड नव्हते. शेती समृध्द होती. शहराच्या वाऱ्यापासून दूर होती. आशा काळातील शेतात काम करणाऱ्या स्त्रीचा हा आर्त काळजात घर करतो. माती आणि माय याचं नातं, त्यातील एकत्त्व भालेरावांच्या कवितेत जे भेटतं त्याची उकल या दीर्घ कवितेच्या प्रारंभी आहे.

'मातीवर वल्ला गोळा माती तोंडात गेलेली'[३]

अशी सर्जक माती व माय ओल्या गोळ्यावर संस्कार करतात. या संस्काराचे बाळकडू पिऊन माती व मायेच्या अंगाखांद्यावर निवेदक मोठा होतो. मातीची व शेतकऱ्याची कहाणीच्या निवेदनात जी एक नैसगिर्क लय आलेली आहे. त्याचा प्रारंभ वल्ल्या गोळ्यापासून आहे. त्यामुळे निवेदक मातीचे ऋण विसरत नाही.

'भर उन्हात जन्मला माती तोंडात घेऊन
वाढलास एवढा तू धान मातीचं खाऊन
मातीसाठीच जगावं मातीसाठीच मरावं
बाळा माती लई थोर तिला कसं इसरावं'[४]

मातीशी इमान बाळगणारी ही कविता जागोजागी मातीला जे नवे परिमाण देते ते नाविन्यपूर्ण असे आहे. लोकभाषेचा साज लेवून आलेली भाषा पोटातले बोलते. पीकपाणी कवितासंग्रहातच कवी भालेराव आपल्या कवितेकडूनच्या अपेक्षा व्यक्त करतात.

'माझ्या कवितेचे बोल
काळजातला बोलावा
उन्हाळ्यात खापराला
जसा असतो ओलावा'[५]

ऐंशी—नव्वदच्या दशकानंतर मराठवाडा—विदर्भात कापूस नगदी पीक म्हणून घेण्यात येऊ लागले. पांढरं सोनं म्हणून आधार वाटणारा कापूस शेतकऱ्याचा जीव घेऊ लागला. या कापसामुळे शेतकऱ्याच्या घरात औषधी डबे येऊ लागले. उत्पादन खर्च वाढू लागला. पण कापसाला भाव मात्र मिळत नव्हता. कापसामुळे उद्धवस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या अनेक कथा विदर्भ—मराठवाड्यात आहेत. या कहाण्यांना जीभा देण्याचं काम आम्ही काबाडाचे धनी या काव्यसंग्रहाने केले. शेतकऱ्याकडे पैसा नसेल तर किरकोळ दुकानदार, फेरीवाले कापसाच्या वजनाबरोबर आपला माल तोलत, नडीला आलेल्या शेतकऱ्याचा कापूस भारावर घेतला जाई. पेरू घ्यायचा असेल तर एक भार कापूस च्या बदल्यात दोन भार पेरू मिळत असे. अशा स्थितीत नव्वदचे दशक विदर्भ—मराठवाड्यासाठी कापूस पीकाच्या संदर्भात प्रचंड बदलाचे ठरले. सर्व व्यवहार कापूस या पीकावर अवलंबून असल्याने व्यवहारातल्या नैतिकतेची कसोटी कापूस हे पीक ठरवत होते. इ. स. १९९० ते २००० या दहा वर्षातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे सर्वेक्षण केल्यास शेतकऱ्यांच्या व्यथा कळतील. कापसाच्या शेती बरोबर कुणब्याचे स्वप्न फुलत असे व स्वप्न भंग होत असे अशी परिस्थिती होती. पण या व्यथांचा आवाज जगासमोर पोहचला

नाही अन् पोहचलाच असेल तर त्याची म्हणावी तशी नोंद घेतली गेली नाही. या व्यथांची नोंद इंद्रजित भालेराव घेतात.

कापसाची बोंदरी म्हणजे कापसाच्या चार पाच वेचण्या झाल्यानंतर शेतात कुठे कुठे कापूस एखादया दोन बोंडाच्या रूपात शिल्लक असते. पूर्वीच्या चार पाच वेचणीत बोंडाच्या राहिलेल्या नक्या असतात. अशा कापसाच्या वावरात जावून बोंदरीचा कापूस वेचताना नक्याच्या तिक्ष्ण टोकाने ओरखाडे ओढले जातात. आम्ही काबाडाचे धनी कवितेतील निवेदक नवीन सदरा घेण्यासाठी हे सर्व ओरखाडे सहन करतो. ढोरामागे राहून भळीतील, झाडावरचा ही कापूस जमा करतो कारण नव्या कापडाचं त्याल अप्रुप असतं.

'ढोरं वळता वळता जमा करून बोंदरी
तुह्या हातानं इकून शिव कापडं साजरी'[६]

बोंदरी जमा केलेल्या निवेदकाचं नवीन सदरा घेण्याचं स्वप्न असतं. तर निवेदकाच्या बापचं घराचे हाल आता दूर होतील अस स्वप्न असतं. पण स्वप्न सत्यात उतरण्यासाठी गुदास्ता असलेला कमाल भाव शेतकऱ्याला प्रारंभीच मिळायला हवा. पण शेतकऱ्याचा माल आडतीवर यायला लागला की भाव कोसळतात.

'तालुक्याच्या आडतीत नेऊ इकायला माल
हाती येईल पईसा तव्हा संपतील हाल'[७]

पण भाव कोसळतो. बापच कोसळतो, कोलमडून पडतो. एका वर्षाची मेहनत पणाला लागते. तीन्ही ऋतुतून तळहाताच्या फोडाप्रमाणे वाढवलेला कापूस त्याचे मोल होत नाही. जागोजागी कापाकापी होते आणि हे आजही सुरू आहे. व्यापाऱ्याकडून होणारे हे शोषण कधी थांबणार हे कळत नाही.

'भावामधी, काट्यामधी, पस्तोरीत उणीपुरी
ज्यानं त्यानं जिथं तिथं देल्या हातावर तुरी
पट्टी घेऊन येतानी त्याचा उतरला नूर
जनू वाहून गेलाय उभ्या झाडावर नूर'[८]

कापूस विकताना शेतकऱ्याला अडचणींना सामोरे जावे लागते. व्यापारी आपल्या अंगाला काहीच लावून घेत नाही. तराजूपर्यंत कापसाचे भोत ही त्यानेच ढकलत न्यायचे. हमाल त्तफ तराजूची साखळी अडकवणार पण हमालीचे पैसे आडत्या देत नाही. दर क्विंटलमागे हमालीचे पैसे पट्टीतून व्यापारी वळते करून घेतो. मराठवाड्यात कापूस मोजमाप झाल्यावर क्विंटल मागे एक–दोन किलो 'कडता' कापण्याची व्यापाऱ्याची पध्दत आहे. अशी हळुहळू पट्टी कमी होत जाते. वर्षभर नेलेल्या बियाण्याची, खताची बाकी त्यातून वळती करून घेतली जाते. भाव जर उतरला तर शेतकऱ्याला रिकाम्या हाताने जावे लागते. निवेदकाच्या बापाच्या बाबतीत असेच होते.

'कापसाचा भाव आज उतरला एकाएकी
सारी काढून उचल आडत्याची हाय बाकी'[९]

अशा परिस्थितीत 'काबाडाचे धनी' हे शिर्षक दीर्घ कवितेला का दिले याची उकल होते. वर्षभराच्या ढोर मेहनतीनंतर जर हातात काहीच शिल्लक नसेल तर कुणब्याची काय अवस्था होत असेल याची जाण व्हायला हरकत नाही. शेतकऱ्यांच्या कष्टाचं मुल्य कोणाच्या पदरात जातं. हे उघड आहे. या चालबाजीवर कवी मामिर्क भाष्य करतो व कवितेतील निवेदकाचे आत्मभान जागे व्हायला लागते.

'काल चढवून भाव कोन उतरीला आज
कोन राबतं शेतात कोन करतया राज
————————
कोन कोठून आले हे आता ठरवाया भाव'[१०]

या चालबाजीने निवेदकाचा बाप उद्धवस्त होतो. मुलाची बोंदरी ही आडत्या सोडत नाही. आता मुलाला कोणत्या तोंडाने हे सर्व सांगायचे हेच कोडे त्याच्यासमोर असताना निवेदकाचं स्वप्न धाडस करून बापासमोर बोलु लागतं. सैरभैर झालेला बाप आपल्या पोटच्या पोराला मारतो. नव्हे तो स्वतःलाच मारत असतो.

'मला मारता मारता थरथरत्या हातानं
चावू लागला व्हटाळी सोता आपल्या दातानं'[११]

व्हटाळी चावण्याचा अर्थ स्वतःवरचा राग त्यापेक्षाही या समाजव्यवस्थेवरचा राग तो व्यक्त करतो. यावरचे भाष्य विचार करायला लावते.

'कापसाच्या धाग्यातून होते कापड तयार
पिकविणारे कापूस उघडेच राहणार'[१२]

एवढं शोषण उघड्या डोळ्यांनी सरकारही पाहतो, बुध्दीजीवीही पाहतात, समाजही पाहतो. पण ही लुटारूंची व्यवस्था बदलण्याची कुवत आपल्यात नाही की काय? किंवा हे सर्व जाणिवपूर्वक केले जाते असे म्हणावे लागेल. हरितक्रांतीनंतर पाऊस कमी होईल, नद्यांच पाणी कमी होईल, विहिरी आटतील असं ही भाकित काही लोकांनी केलं होतं. हे इतक खरं होईल असं कुणालाही वाटलं नसेल. पण तसं झालं. त्यापेक्षा दुर्दैव म्हणजे माणूसकीही आटायला लागणं हे होय. हा हल्ला मात्र कृषीसंस्कृती पचवू शकली नाही. भाव उतरल्याने पैसा हातात आला नाही. पैसा नाही त्यामुळे नाती दुरावली. हसत्या खेळत्या वाड्यातील चौतन्य हरवायला लागलं. याची चाहूल काबाडाच्या धनीतून पदोपदी व्यक्त झाली आहे. नाती दुरावायला लागली त्यातला कच्चेपणा उघडा पडायला लागला. आथिर्क व सांस्कृतिक बाबतीत अशी पडझड होऊ लागली की संकट दूर नसतात.

'कशी हरवली भुई वाडा निखळला आख्खा
अवशेषात वाड्यांच्या भाचा हरवला सख्खा'[१३]

'आम्ही काबाडाचे धनी' कथाकाव्य लोककथेचे रूप घेत आहे. ते त्यातील अंगभूत सामर्थ्यामुळे. या कथेचा सच्चेपणा व वेदनेची ठणक परिणामकारक अशीच आहे. शेतकऱ्यांच्या सुख–दुःखाचे बहुपदरी निवेदन या काव्याची व्यापकता वाढवते. जन्माच्या वेणा बरोबरच शेतीच्या वेदना भावविभोर झाल्या आहे. कुटुंबकहाणीतील दुःखे काळजाचा तळ गाठतात. बहिनीच्या मृत्यूनं निवेदक व त्याचे कुटूंब सैरभैर होते. दुःखाची ही गहिरी छटा पुढीलप्रमाणे व्यक्त होते.

'मोठा नांगर लोखंडी रानरिफत चालला
सहा बैलाच्या ओढीनं रान चिरत चालला
तसा सांगावा सांगत आला काळीज फाडीत
बहिनीनं जीव देला फास लावून झाडीत'[१४]

बहिनीच्या मृत्यूने शोककळा पसरते. बाप उद्धवस्त होतो तर आई म्हणते.

'माय बोले, जित्या, मेट मोडलेल्या गाई
वासराला मरनाची अशी कशी झालीघाई'[१५]

अशी अनेक संकटे येऊनही तो सावरतो. नव्या जोमाने कामाला लागतो. दुःखाचे अनेक कढ दाबतो. टोचत असलेली सल झाकतो. सर्जक मातीच त्याला ऊर्जा पुरवते. तो खुशाल कामाला जुपून घेतो.

'रात पहाट करून उलथिली मोठी सुगी
कव्हा हासली सगुनी कव्हा झाली उगी उगी
करडीच्या खळ्यामधी काटे टोचले आंगाला
तुर बडविली कव्हा गुळी लावून भांगाला'[१६]

करडीचे खळे व तुरीचे खळे म्हणजे शिवाराचा आनंद सोहळा असतो. तुर बडवल्यानंतर दाणे व भुसा वेगवेगळे होते. हे मोठ्या कष्टाचे काम असते. पण शेतकऱ्याच्या भाळी रात्रंदिन कामधंदा असल्याने कष्टात तो मागे नाही. तुरीचा भुसा म्हणजे गुळी भांगात मिरवणाऱ्या निवेदकाचे शेतीशी किती घट्ट नातं आहे हे मातीशी त्याची बांधिलकी दर्शवते.

कृषी संस्कृतीत 'खळे' एक उपचार म्हणून येत नाही. शेतकरी व त्याच्या कुटूंबाचे, गावाचे भावविश्व खळ्याशी जोडलेले असते. अर्थात खळ्यात व नंतरच्या कष्टाच्या गोष्टी अनेक असतात. खळ्यातील भुसकुटाची कचकच, वाळाह्या रचतानाची कंबरमोड, धसकटाच्या रानातील जिभाळी–कष्ट करत असताना शेतकऱ्याला या गोष्टींना सामोरे जावे लागते. तेव्हा रान पिकते. धान्य घरी येते, पण प्रत्येक कष्टाच्या आवर्तनानंतर शेतातील चित्र बदलत जातं आणि ते बदल मन हरखून टाकणारं असतं. खळ्यात भुसकुटाची कचकच असली तरी खळ्यातील मोत्यासारखे दाने पाहून शेतकरी हरखून जातो. श्रमपरिहार होते. शेतकऱ्यांच्या या वेदनांसह रान फुलत जातं. लोकांना खायला अन्न, लत्ता कपडा मिळतं.

'जेवारीच्या खळ्यामधी भुसकुट कुचकूच
कव्हा रचल्या वाळाह्या कडण्याची उचउच
खुरकुट्या खर्चटुन कळा झाली काळी काळी
धसकटाच्या रानात कव्हा लागली जिभाळी'[१७]

खळी–दळी झाल्यानंतर काही दिवस विश्रांती मिळते. पर पेरणीपूर्व मशागतीची काम करण्यासाठी रान हाका मारायला लागतं. घामाचा हा अखंड वसा शेतकरी वाहतो.

'उठा करा काम आता, रानातून आली हाक
चार दिस झोपलेला पुन्हा जागा झाला धाक
ऊन तापून तापून खाकसली काळी माती
उभ्या आडव्या फाळानं केली उलथी पालथी'[१८]

अशाप्रकारे पेरणीपूर्व मशागतीची कामे ते सुगी असा श्रमाचा यज्ञ शेतकरी करतो. पण अस्मानी व सुलतानी संकटानी तो मोडून पडतो. ८०–९० च्या दशकानंतर संकटाची आवर्तने वाढायला लागली. हरीतक्रांतीनंतर संकरीत बियाणांचा वापर व एकुणच आधुनिक शेतीचा खर्च, जास्त उत्पादनाच्या हव्यासापाङ्मी वाढू लागला. अपेक्षित उत्पन्नासाठी निसर्ग व सरकार या दोन घटकाचा परिणाम शेतकऱ्याच्या जगण्यावर होऊ लागला. साधारणपणे ८०–९० च्या दशकापूर्वी पारंपरिक शेतीत उत्पादन खर्च अल्प स्वल्प होतं. बियाणे शेतकऱ्याकडेच असायचे. शेणखतावरच त्याचा गाडा धकायचा. पण नंतर अन्नधान्य उत्पादन वाढीसाठी संकरित बियाणे, रासायनिक खते यांचा वापर वाढला व उत्पादन खर्च वाढू लागले. त्याप्रमाणात उत्पन्नाची जुळवणी झाली

नाही तर शेतकरी मोडून पडू लागला. आम्ही काबाडाचे धनी मध्ये शेतकऱ्याच्या कळा समर्थपणे व्यक्त झाल्या आहेत.

आम्ही काबाडाचे धनी या काव्यसंग्रहातून शेतकऱ्यांच्या शेती संबंधित वेदनांबरोबर घरातील मृत्यूच्या वेदनाही आल्या आहेत. निवेदकाच्या बहिनीचा मृत्यू नंतर निवदेकाच्या पत्नीचा सगुनीचा मृत्यूही काळीज चिरत जातो. ती डोळ्यादेखत पुरात पाहून जाते. पूरात वाहून जाण्याच्या कहाण्या गावोगावी आहेत. वेगळ्या रूपात आनंद यादव व अप्पासाहेब खोत त्यांच्या कथात्म साहित्यातून याचे काळीज विदीर्ण करणारे प्रसंग येतात. आम्ही काबाडाचे धनीत याला काव्यात्म रूप लाभले आहे.

'पूर चालला दुथडी काय काय त्याच्या संग
त्याच्या पान्याला आलाय लाल रघताचा रंग
तुला लोटलं सगुने नको मनता पाण्यात
कसा घातला मोडता सुरू झालेल्या गान्यात'[१९]

आणि आकांत सुरू होतो, रुदन सुरू होते सगुनीच्या आठवणींनी रूढ निवेदकला हुंदका दाटून येतो. सगुनी गर्भवती असल्याने हे दुःख आणखीन वाढते.

'तुह्या पोटातलं बाळ काय मनलं आसंल
———————————
केला आसंल आकांत नाळतल्या नाळंमधी'[२०]

या रुदनाला बंजारा–लमाण समूहातील 'ढावलो' या लोकगीतासारखी परिणामकारकता लाभली आहे. बंजारा–लमाण समूहात सुखदुखाच्या प्रसंगी स्त्रिया मोठ्याने गाण्याच्या रुपात रूदन करतात.

'मह्या मातीच्या दारात तुवा रुजविलं रोप
पानं फुल येण्याआधी का बा दिला त्याला शाप
दुजा नव्हतो मी देवा पानीवाला तिऱ्हाईत
काळजात रुजलेली होती मही जिराईत'[२१]

निवेदकाच्या दृष्टीने सगुनीच्या आठवणी व सगुनीच्या दृष्टीने निवेदक असेही रूप या रुदनाला लाभले आहे. कवी इंद्रजित भालेराव यांचे काव्य वेदना व्यक्त करताना समर्थ होत जाते. या वेदना, व्यथा आम शेतकऱ्यांच्या जीवनात प्रायः येतात. त्याचे प्रातिनिधिक चित्र इंद्रजित भालेरावांच्या 'आम्ही काबाडाचे धनी' काव्यसंग्रहातून उभे राहते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्याच्या मुलांना ती आपली कहाणी वाटते. या कहाणीला व्यापक परिणाम लाभतात. लोककथा काव्यासारखी ही कविता फुलून येते. शेतकऱ्यांच्या वेदनांचा बांध या कवितेतून फुटला आहे आणि तो अनावर आहे.

## संदर्भ


१. नामदेव गाथा, (संपा.) ह. श्री. शेणोलीकर, पृ. ५७.
२. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ६.
३. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ६.
४. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. १०.
५. पीकपाणी, इंद्रजित भालेराव, पृ. ६.
६. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. १४.
७. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. १५.
८. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. १६.

९. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. १६.
१०. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. १७.
११. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. १८.
१२. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. १८.
१३. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. २२.
१४. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. २६.
१५. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ३०.
१६. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ४४.
१७. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ४५.
१८. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ४५.
१९. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ५०.
२०. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ५१.
२१. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजित भालेराव, पृ. ५१.